# INDIAN MEDICAL ASSOCIATION, PUNE BRANCH

2017 - 18

Dr. Nitu Mandke IMA House, 992, Shukrawar Peth, Tilak Rd., Pune - 411 002.
Email : imaofpune@gmail.com Website : www.imapune.org
Telephone : 020 - 24430042 / 24464771 Office Hours : 11am to 6pm

Unity is Strength

**Theme : Unity is Strength**

**President** Dr. Prakash Marathe 9823071292
**Hon. Secretaries** Dr. B. L. Deshmukh 9960172759, Dr. Rajkumar Shah 9422500666
**Hon. Treasurer** Dr. Aarti Nimkar 9822304882

**Imm. Past President** Dr. Mohan Joshi 9960362832
**President Elect** Dr. Padma Iyer 9373305154
**Vice President** Dr. Sanjay Patil 9822520257
**Jt. Hon. Secretary** Dr. Meenakshi Deshpande 9922464365
**Asst. Sec. & Jt. Treasurer** Dr. Raju Varyani 9822646025


Ref No:-IMA/PN/GEN/2017-18/290

06 Nov 2017

**मा. पोलिस कमिशनर,**
पुणे

महोदय,

गेल्या दोन दिवसात पुण्यातील रस्त्यांवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नावाने हॉस्पिटलमधील उपचारांसबंधी होर्डिंग्ज व बॅनर्स लागले आहेत. नमुन्यादाखल दोन उदाहरणे सोबत देत आहोत.

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार सर्व रुग्णालये अपघातात जखमी झालेल्या नागरिकांवर प्रथमोपचार करतातच, याची आपल्याला कल्पना आहे.

इतर इमर्जन्सीच्या वेळी सुध्दा रुग्णालये शक्यतो तातडीच्या उपाययोजना केल्यानंतरच रुग्णाच्या नातेवाईकांना पैसे भरायला सांगतात.

परंतू पैश्यांशिवाय या पुढील उपाय करणे रुग्णालयांना अशक्य असते. त्याची कारणे पुढील प्रमाणे :

१) राष्ट्रीय उत्पन्नाच्या १% हून कमी पैसे सरकार आरोग्य सेवेवर खर्च करते. यामुळे मोडकळीला आलेली सरकारी आरोग्यसेवा फक्त २०% रुग्णांवरौपचार करते, बाकी ८०% रुग्णांना खाजगी रुग्णालयांत अथवा दवाखान्यांत उपचार घ्यावे लागतात. यामधे रुग्णालयांचा दोष नसून सरकारचा दोष आहे हे कृपया संबंधितांनी ध्यानात घ्यावे.

२) रुग्णालय आस्थापनेसाठी सरकार अथवा कोणतीही सामाजिक संस्था आर्थिक मदत करन नाही, अथवा बॅक स्वस्त दरात कर्ज देत नाही किंवा थकलेले कर्ज माफही करत नाही.

३) रुग्णालयातील यंत्रसामुग्रीच्या देखभालीवर प्रचंड प्रमाणात पैसे खर्च होत असतात आणि ते न केल्यास यंत्र बंद पडल्यामुळे रुग्णांना उपचार देण्यात अडथळा येऊ शकतो.

४) अतिदक्षता विभागात वापरायला लागणारी औषधे खूप वेळा खूप महाग असतात आणि त्यांचा साठा रुग्णालयाला ठेवावाच लागतो कारण रुग्णाच्या नातेवाईकांना चिठ्ठी देऊन त्यांनी औषधे आणेपर्यंत जाणाऱ्या वेळात रुग्ण अत्यवस्थ होऊ शकतो, पर्यायाने उपचारांचा खर्च वाढतो आणि आयुष्याला धोका निर्माण होऊ शकतो.


**MANAGING COMMITTEE MEMBERS**

Dr. Anwar S. Z. (CGP), Dr. Bhondwe Avinash, Dr. Bhutkar Avinash (Sp. Invitee), Dr. Damle Sham, Dr. Daultani Nirmala, Dr. Halbe Arun, Dr. Ingale Sunil, Dr. Joshi Rajeev, Dr. Joshi Rajendra, Dr. Kelkar Shreekant, Dr. Khedkar Milind, Dr. Khinvasara Pradeep, Dr. Lokapur Madhuri, Dr. Mahajan Prakash, Dr. Mantri Nandkishor, Dr. Navarange Jayant (Exe. Trustee), Dr. Nene Suhas, Dr. Patwardhan Vaijayanti, Dr. Rodrigues Hillary, Dr. Sancheti Rajan, Dr. Sarda Dilip, Dr. Shahade Ambrish, Dr. Tulpule Maya, Dr. Wagh Girija

Registered under The Bombay Public Trust Act of 1950, Schedule 1. Trust No. F165, Pune

५) त्यामुळे तातडीच्या उपाययोजना अथवा अपघातातील रुग्णाला स्थिरस्थावर करेपर्यंत रुग्णालयाने माणुसकीच्या भावनेने सेवा दिल्यानंतर पुढची उपाययोजना करणे रुग्णालयांना आर्थिक दृष्ट्या अशक्य असते.

६) अश्या प्रकारे किती रुग्णांना किती दिवस सेवा देता येईल यावर आर्थिक मर्यादा येत असल्यामुळे पुढील उपचारापूर्वी रुग्णाच्या नातेवाईकांनी पैसे भरणे जास्त संयुक्तिक आहे.

७) रुग्णाचा विमा असल्यास त्याला तातडीच्या उपचारासाठी पैसे भरावे लागत नाहीत, परंतू फक्त ५ ते ८ टक्के व्यक्तींचाच आरोग्य विमा उतरवलेला असतो ही समाजाची शोकांतिका आहे. तसेच विमा कंपन्या फक्त काही रुग्णालयांकडून उपचार घेतल्यासच बिलाची भरपाई करतात ही विमा कंपन्यांकडून रुग्णांची होणारी फसवणूक आहे, यात रुग्णालयांचा काही दोष नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

८) राजकीय पक्षांनी अश्या प्रकारे हॉस्पिटल्सना दमदाटी करणारी होर्डिंग्ज व बॅनर्स चौकाचौकात लावण्यासाठी आपली अथवा महानगर पालिकेची परवानगी घेतली आहे काय हे कृपया आय. एम. ए. ला कळवावे.

९) उपचार केल्यानंतर पैसे न देता रुग्ण घरी निघून गेल्यास त्या बिलाची भरपाई राजकीय पक्ष, पोलिस कमिशनर अथवा राज्य सरकार यापैकी कोण करणार आहे आणि ती भरपाई किती दिवसात करणार आहे हे आय एम. ए. ला कळवल्यास संस्थेच्या सदस्यांना तसे कळवणे सोयीचे जाईल.

रुग्णालये अथवा डॉक्टर्सना दमदाटी करण्यापेक्षा, सरकारी आरोग्य सेवा कशी सुधारता येईल, त्यातील भ्रष्टाचार कसा कमी करता येईल याकडे राजकीय पक्षांनी आणि समाजकारण्यांनी लक्ष दिल्यास देशाचे आरोग्य सुधारेल असे आम्हाला वाटते.

तरी अश्याप्रकारची होर्डिंग्ज आणि बॅनर्स ताबडतोब काढून टाकण्याचे आदेश द्यावेत ही विनंती. अन्यथा आय. एम. ए. ला सर्व रुग्णालयातील तातडीच्या सेवा बंद कराण्याचे आदेश द्यावे लागतील याची कृपया नोंद घ्यावी.

**डॉ. प्रकाश मराठे**
अध्यक्ष, आय. एम. ए. , पुणे

BLDeshmukh
**डॉ. बी. एल. देशमुख / डॉ. राजकुमार शहा**
सचिव, आय. एम. ए., पुणे

**डॉ. जयंत नवरंगे**
चेअरमन, मेडिकोलीगल सेल

INDIAN MEDICAL ASSOCIATION ★ PUNE BRANCH ★

Enclosed: photos of 2 representative hoardings



प्रति,
मा.व्यवस्थापक.
सर्व हॉस्पिटल खबरदार...
डिपॉजीटकरीता उपचार थांबवताल तर..
मनसेशी गाठ असेल..!
रुग्णनातेवाईक अधिक माहितीसाठी संपर्क :
कल्पेश यादव
(पुणे शहर अध्यक्ष म.न.वि.से)
संपर्क क्र. ९६२३३३७७७७
चौक
यशवंत ग्रुप


हॉस्पिटल संदर्भात
तक्रार असल्यास
संपर्क साधा.